संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# मोदींकडून संघपरिवाराचा मुखभंग

**चाळीस** वर्षांपूर्वी असलेली राजकीय परिस्थिती आज नाही हे देखील पन्नास वर्षे राजकारण करत असलेल्यांच्याही लक्षात येत नसेल तर ते आश्चर्यच म्हणावे लागेल. चाळीस वर्षांपूर्वी राममंदिराच्या मुद्द्याने देशाचे संपूर्ण राजकारण ढवळून निघाले होते. देशात राममंदिराशिवाय दुसरा मुद्दा नव्हता. लोकसभेत केवळ दोन खासदार असलेल्या भारतीय जनता पार्टीने याच मुद्द्यावर निवडणुका लढवल्या आणि त्यांचे जवळपास दोनशे खासदार निवडून आले. नंतरच्या काळात राममंदिराचा प्रश्न मागे पडत गेला. फक्त अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना याच मुद्द्याने उचल खाल्ली आणि वाजपेयींना आपले सरकार गमवावे लागले. आताही तोच खेळ सुरू आहे. संघपरिवार राममंदिरासाठी वटहुकूम काढावा अशी मागणी करत सुटला आणि त्याचा जबरदस्त फटका भाजपाला बसला. तीन राज्यातली सत्ता या पक्षाला गमवावी लागली. जर राममंदिरापेक्षा विकासाचा मुद्दा प्रभावीपणे प्रचारात आणला असता आणि संघपरिवाराने 'देशाचा विकास हा समाजाला एकत्र आणून देशाला भक्कम करणारी गोष्ट आहे', असे जर ठासून सांगितले असते तर आज परिस्थिती वेगळी राहिली असती. परंतु पुन्हा भाजपाचे सरकार येईल की नाही याबद्दलच संघपरिवाराच्या मनात शंका निर्माण झाली. मोदींचा करिश्मा आता चालणार नाही याची सर्वप्रथम जाणीव संघपरिवाराला झाली आणि मग आपल्याच विचारसरणीचा वसा पुढे नेणाऱ्या पक्षाबद्दल आणि नेत्याबद्दल संघपरिवारानेच अविश्वास दाखवल्याने जनतेनेही भाजपाविषयी अविश्वास दाखवला आणि विरोधी मतदान झाले. आता राममंदिराच्या मुद्द्यात तितका दम उरलेला नाही, हे सामान्य जनतेनेच भाजपाच्या लक्षात आणून दिले आणि केवळ पंतप्रधान मोदींनी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत राममंदिराबाबत वटहुकूम काढला जाणार नाही, असे जे ठणकावून सांगितले आहे, ते आम्हाला अधिक महत्त्वाचे वाटते. त्यांच्या या विधानामुळे संघपरिवाराचा चांगलाच मुखभंग झाला आहे. अनेक वर्षांनंतर मिळालेली एकहाती सत्ता प्रयत्नांची पराकाष्ठा करून टिकवली पाहिजे. विकासाचे नवे विक्रम प्रस्थापित करून लोकांना आपलंसं केले पाहिजे. 'सबका साथ सबका विकास' ही नरेंद्र मोदींनी दिलेली घोषणा सामान्य माणसातही विश्वास निर्माण करणारी ठरली होती. त्याला भरभक्कम समर्थन देण्याऐवजी राममंदिराचा विषय पुढे करून संघपरिवारानेही आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला.

## संधीचे महत्त्व कळले नाही

यासाठीच आम्ही असे म्हणतो की, निवडणुकीपूर्वी पोतडीतून बाहेर काढलेला हा मुद्दा राजकीय लाभ मिळवून देणारा ठरू शकत नाही. नरेंद्र मोदींना सरकार वटहुकूम काढणार नाही हे स्पष्टपणे किंवा जाहीरपणे सांगावे लागले, यावरून संघ आणि भाजपामध्ये सध्या बऱ्यापैकी बेबनाव आहे, हे सिद्ध होते. आम्ही यापूर्वी पण म्हटले होते की भाजपाचे संख्याबळ कसे वाढेल आणि त्या मोठ्या संख्याबळाच्या जोरावर राममंदिर किंवा काश्मीरचे ३७० कलम, किंवा समान नागरी कायदा यासारखे विषयसुद्धा हातावेगळे करता येऊ शकतील. परंतु आपल्याच लोकांवर विश्वास ठेवायचा नाही आणि आम्ही सांगू तसेच भाजपाने वागले पाहिजे, असा हट्टीपणा करायचा याला अपरिपक्व राजकारण म्हणतात. अनेक वर्षांनंतर मिळालेल्या सत्तेचे महत्त्वही यांना लक्षात येत नाही. राममंदिर हा सर्वसमाजाच्या सहमतीने साकार करण्याचा मुद्दा झाला आहे. चाळीस वर्षांपूर्वी असणारी प्रतिकूल परिस्थिती आज राहिलेली नाही. बरेचसे सकारात्मक वातावरण निर्माण झालेले आहे. त्या वातावरणाची आणखी सशक्त आखणी आणि बांधणी करण्यावर जर संघपरिवाराने भर दिला तर ते जास्त फायद्याचे ठरेल. ना लोकांचा पाठिंबा, ना राजकीय अनुकूलता अशी परिस्थिती असताना या मुद्द्याचे अनौचित्य ठळकपणे सिद्ध होते. निदान आतातरी संघपरिवाराने दुराग्रह न धरता सौहार्दाच्या वातावरणातून सर्वार्थाने राष्ट्र बळकट करण्यावर भर द्यावा. भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात गेल्या चाळीस वर्षात खेळले गेलेले राजकारण आता चांगलेच बदलले आहे. लोकांची राजकीय परिपक्वता वाढल्याचेच ते निदर्शक ठरते. ती समजून घेण्याचा तितकाच प्रामाणिक प्रयत्न व्हायला हवा.

## जुने मुद्दे गैरलागू

ही तर आणखीनच मोठी विडंबना ठरते की राममंदिराबाबत वटहुकूम काढणार नाही हे थेट नरेंद्र मोदींनाच सांगावे लागले. यावरून समान विचारसरणी असलेल्या भाजपा आणि संघ यामध्ये मोठाच विसंवाद आहे. अंगावर आलेला राफेलचा मुद्दा, तीन राज्यात झालेला पराभव, महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात शिवसेनेने उभे केलेले आव्हान अशा अनेक आघाड्यांवर चिंताजनक परिस्थिती आहे. अशावेळी मतांच्या बाजारात राममंदिराला ढकलून भाजपा किंवा संघाला स्वार्थ साधता येणे कठीण आहे. आता निदान लोकसभा निवडणूक होईपर्यंत किमान न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत हा विषय तापविण्याचे धोरण बाजूला ठेवावे लागेल. किंबहुना त्यातच शहाणपण असेल. म्हणूनच अनेक वर्षे राजकारण करून जुने मुद्दे नव्या परिस्थितीत गैरलागू ठरतात हे समजून घेण्याची वेळ आली आहे. मोदींनी ठोस भूमिका घेतल्यामुळे हुंकार सभा घेऊन आक्रस्ताळेपणा करणाऱ्या संघनेत्यांना चांगलीच चपराक बसली आहे.